# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### माचाळ (ता.लांजा, जि. रत्नागिरी) येथील "ब" पर्यटन क्षेत्रातील अपूर्ण रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) १२३९४ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील माचाळ "ब" पर्यटन क्षेत्रातील अपूर्ण रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तत्कालिन नगरविकास राज्यमंत्री तथा पालकमंत्री, रत्नागिरी यांना दिनांक २२ मे, २०१४ रोजी पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :** (१), (२) व (३) तत्कालीन पालकमंत्री, रत्नागिरी यांना लोकप्रतिनिधींनी दिलेले दि. ४/२/२०१४ चे पत्र जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना प्राप्त झाले आहे. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतून रस्ता पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

---

### रत्नागिरी जिल्हयात कुष्ठरोग वसाहतीची झालेली दयनीय अवस्था

**(२) १२४२८ (०६-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात कुष्ठरोग वसाहतीची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीमध्ये आवश्यक सोई-सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वसाहतींची सुधारणा करणे व आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

कुष्ठवसाहतीमधील सद्य:स्थितीत कुष्ठरुग्ण राहत असलेल्या काही घरांची पडझड, गळती व भिंतीना तडे गेले आहेत.

(२) व (३) आरोग्य विभागामार्फत वैद्यकिय पुनर्वसन कुष्ठवसाहतीमधील कुष्ठरुग्णांना वैद्यकिय सेवा सहाय्यक संचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी अंतर्गत प्रा.आ.कैंद्र शिरगाव येथील वैद्यकिय अधिकारी नियमितपणे मोफत औषधोपचार, सेल्फ केअर किट, एम.सी.आर. चप्पल, गॉगल्स, स्प्लिटस् वाटप व संदर्भ सेवा केंद्र येथे गुंतागुंत असणाऱ्या कुष्ठरुग्णांना इतर आरोग्य सुविधा देण्यात येतात.

वसाहतीमधील अंतर्गत रस्ते, पाणी, विद्युत पुरवठा, शौचालय व्यवस्था इ. सोई सुविधा मोफत केली आहे. कुष्ठवसाहतीमधील किरकोळ दुरुस्तीचे काम करण्याबाबत सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठ व क्षय), पुणे यांच्यामार्फत ग्रामपंचायत शिरगांव यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कुडप (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे लघुपाटबंधारे योजनेबाबत

**(३) १२४३० (०६-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुडप (जि.रत्नागिरी, ता. चिपळूण) येथे लघुपाटबंधारे योजना मंजूर असूनही काही स्थानिक पुढा-यांच्या विरोधामुळे सदर योजना रद्द करण्याची कार्यवाही जलसंपदा खात्याकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी धरण होणे आवश्यक असून स्थानिक जनतेची यासाठी मागणी व सहमती असून सदरचे काम रद्द न होता तातडीने सुरु होणेबाबत स्थानिक लोप्रतिनिधींनी मा. जलसंपदामंत्री, मा. जलसंपदा राज्यमंत्री तसेच संबंधित कार्यालयांकडे दि.२१/१२/२०१४ रोजी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे, कुडुप ल.पा. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील मौजे सावर्डे गावातील लोकांचा प्रकल्पास तीव्र विरोध आहे. प्रकल्प रद्द करण्यासाठी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ५९ व्या बैठकीतील ठराव क्र.५९/७ नुसार मान्यता प्राप्त आहे.

(२) होय.

(३) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(जि.रत्नागिरी) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील कामे करण्यास बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्यांनी नकार दिलाबाबत**

**(४) १२४४७ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (जि.रत्नागिरी) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील कामे करण्यास बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्यांनी नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हयातील नव्याने मंजूर असलेल्या सुमारे अडीचशे कोटींचा आराखडा तसेच सद्या सुरू असलेल्या मनरेगातील सुमारे साडेचार हजार कामे रखडणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाखा अभियंत्यांनी कामे करण्यास नकार देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत बांधकाम विभागाकडील शाखा अभियंताकडून मग्रोरोहयो अंतर्गत कामे करण्यास दि.६ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे नकार कळविला होता.

या प्रकरणी अभियंता संघटना यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याशी दि.९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या चर्चेनंतर, अभियंता संघटनेने आपले काम बंद आंदोलन मागे घेतलेले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत विविध पदावर कार्यरत असणा-या**
**२२ कर्मचा-यांना सेवेतून निलंबीत करण्यात आल्याबाबत**

**(५) १२४५२ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद रत्नागिरी (जि.रत्नागिरी) अंतर्गत विविध पदावर कार्यरत असणा-या २२ कर्मचा-यांना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निलंबीत करण्यात आलेल्या कर्मचा-यांवर कोणते दोषारोप ठेवण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

दि.१७.१.२०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत दोन कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले आहे.

(२) सदरच्या दोन कर्मचा-यांवर पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

(१) कृषी अधिकारी

कृषी औजारे लाभार्थी हिस्सा वेळेवर भरणा न करता स्वत:कडे ठेवून कार्यालयाची दिशाभूल करणे, शासकीय आर्थिक कामकाजात अनियमितता करणे या कारणाखाली त्यांना दि.१६.१.२०१५ रोजी निलंबित केले आहे.

(२) ग्रामसेवक

१२ व १३ वित्त आयोगामधून झालेल्या कामामध्ये अपहार करणे, ग्रामनिधिमध्ये अपहार करणे, ग्रामपंचायतीचे उत्पर उपलब्ध करुन न देणे या कारणाखाली त्यांना दि.१७.१.२०१५ रोजी निलंबित केले आहे.

(३) व (४) होय.

सखोल चौकशी अंती श्री.राजेंद्र विठ्ठल कणसे, कृषि अधिकारी व श्री.जितेंद्र मुकुंद मंगले हे दोषी आढळलेने श्री.राजेंद्र कणसे, यांना दिनांक १६.१.२०१५ रोजी तर श्री.जितेंद्र मुकुंद मांगले, ग्रामसेवक यांना दिनांक १७.१.२०१५ रोजी जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच श्री.राजेंद्र कणसे, कृषि अधिकारी यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या स्तरावरती खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणेत आली आहे.

---

**चिपळूण व संगमेश्वर तालुक्यामध्ये (जि.रत्नागिरी) कृषी विभागाकडून बांधण्यात येणारे बंधारे बहूतांशी चुकीच्या ठिकाणी  बांधण्यात येत असल्याबाबत**

**(६) १२४५५ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण व संगमेश्वर तालुक्यामध्ये (जि.रत्नागिरी) कृषी विभागाकडून पाणलोट व्यवस्थापन वा अन्य कार्यक्रमांतून बांधण्यात येणारे बंधारे बहुतांशी चुकीच्या ठिकाणी बांधण्यात येत असून बांधकाम योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे त्यामध्ये पाणी साठवण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे बंधारे योग्य पध्दतीने बांधकाम होणे करीता सर्व्हेक्षण व आदी तांत्रिक कामांसाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी वर्ग कृषी विभागाकडे उपलब्ध नसून कामांच्या निविदा प्रक्रियाही होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दखल घेऊन कामांचा दर्जा सुधारणे, बांधण्याचा हेतू सफल होणे, तसेच तांत्रिक कर्मचारी वर्ग नियुक्त करणे व निविदा प्रक्रिया सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) येथील कार्यालयास प्राप्त झालेला निधी खर्च न झाल्याबाबत**

**(७) १२४५९ (१०-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळमनुरी (जि.हिंगोली) या कार्यालयास मागील ३ वर्षात प्राप्त झालेला विविध आदिवासी योजनांचा बराचसा निधी खर्च न होता शासनाकडे परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी योजनांचा निधी पुर्ण पणे खर्च न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१५) :** (१) होय.
(२) काही आदिवासी विकास योजनांना जिल्हाधिकारी हिंगोली यांची प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने निधी अखर्चित राहिला आहे.
(३) आदिवासी उपयोजने अंतर्गत जिल्हास्तरीय योजनांखालील प्रस्तावांना प्रशासकीय मान्यतेचे उचीत निर्णय घेण्याबाबत जिल्हाधिकारी हिंगोली यांना सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) निरंक

---

**हिंगोली (जि.हिंगोली) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांना नविन उद्योग सुरु करण्याबाबत**

**(८) १२४६० (१०-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या हिंगोली (जि.हिंगोली) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांना नविन उद्योग सुरु करण्यासाठी भूखंड उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन उद्योगांना भूखंड उपलब्ध करुन देण्यासाठी सध्याच्या औद्योगिक वसाहत क्षेत्राचा विस्तार करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीचा विस्तार करण्याच्या योजनेस शासनाकडून तात्काळ मंजूरी देण्यात येईल काय ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
हिंगोली औद्योगिक क्षेत्रामध्ये १९.२२ हे. आर क्षेत्रामध्ये आरेखित करण्यात आलेले ६६ भूखंड वाटपासाठी उपलब्ध आहेत.
(२) हिंगोली औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांची भविष्यातील गरज लक्षात घेता, अति. हिंगोली औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे कुंडकर पिंपरी, संतुक पिंपरी व हिवरा येथील ५२६.४० हे. आर खाजगी क्षेत्र व ३८.५३ हे. आर सरकारी क्षेत्र असे एकूण ५६४.९३ हे. आर क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे.
(३) अति. हिंगोली औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याचा प्रस्ताव उच्चाधिकार समिती पुढे ठेवण्यात आला होता. त्यावेळी सदर क्षेत्रासाठी पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर टप्प्या-टप्प्याने भूसंपादन करण्यास उच्चाधिकार समितीने मंजूरी दिलेली असून, त्याअनुषंगाने पाण्याचे आरक्षण मिळण्याबाबत संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## हिंगोली येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(९) १२४६३ (१०-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये पाणी पुरवठा, अग्नीशमक यंत्रणा, पोलीस चौकी इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे उद्योजकांना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीमध्ये पुरेशा सोयी-सुविधा पुरविण्याबाबत औद्योगिक संघटनांनी शासनाकडे अनेक वेळा निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीमध्ये पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) हिंगोली औद्योगिक क्षेत्रामध्ये रस्ते, पथदिवे, जलवितरणीका इत्यादी प्राथमिक सुविधा उद्योजकांना पुरविण्यात आलेल्या असून विंधन विहिरीद्वारे पाण्याच्या उपलब्धतेनुसार साधारणत: ८ ते १० घनमीटर प्रति दिन पाणीपुरवठा करण्यात येतो.

सदर औद्योगिक क्षेत्रात पोलीस चौकीसाठी महामंडळाने ३१ X ५४ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड पोलीसांना उपलब्ध करुन दिलेला आहे व अग्निशमन व्यवस्थेसाठी देखील ७५ X ८५ मीटर आकाराचा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे.

(२) हिंगोली औद्योगिक क्षेत्रात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत हिंगोली जिल्हा इंडस्ट्रिज असोसिएशन यांनी दि.१९/११/२०१४ रोजी महामंडळाकडे निवेदन सादर केले आहे.

(३) हिंगोली औद्योगिक क्षेत्रासाठी २६ कि.मी. अंतरावर असलेल्या सिध्देश्वर धरणातून ५ दशलक्ष लिटर प्रति दिवस एवढ्या क्षमतेची कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे. त्या दरम्यान सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये तात्पुरती पाणी पुरवठा व्यवस्था करण्यासाठी २ विहीरी घेण्याचे प्रस्तावित असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हा नियोजन समितीच्या वतीने आदिवासीच्या उपयोजनांवर मंजूर असलेला निधी इतर योजनांवर वळविण्यात आल्याबाबत

**(१०) १२४७० (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा नियोजन समितीच्या वतीने सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षात तयार

करण्यात आलेल्या आराखड्यात आदिवासीच्या उपयोजनांवर मंजूर असलेला निधी इतर योजनांवर वळविण्यात आल्याचा आक्षेप घेतले प्रकल्पस्तरीय नियोजन आढावा समितीच्या सदस्यांनी दिनांक १० जानेवारी, २०१५ च्या रोजी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी योजनांसाठी असलेला निधी इतर योजनादर वळती करण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, त्यामुळे आदिवासी समाजावर अन्याय होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा परिषद येथील माध्यमिक विभागाचे शिक्षण अधिकारी यांनी अनुसूचित जागेवर खुल्या प्रवर्गातील मान्यता देऊन केलेला गैरव्यवहार

**(११) १२४७१ (०९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषद येथील माध्यमिक विभागाचे शिक्षण अधिकारी यांनी अनुसूचित जागेवर खुल्या प्रवर्गातील मान्यता देऊन केलेल्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी करुन सन २००४ च्या कायद्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना दिनांक १२ मार्च, २०१४ रोजी पत्र क्र.विकास/मविसे/कार्या-१/प्र.क्र.४८०/२०१४ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :** (१) होय.

(२) या प्रकरणी आयुक्त शिक्षण यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. त्यांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील डिप्लोमा इन कॅम्प्युटर इंजिनिअरिंगच्या अंतीम वर्षाच्या निकालाविषयी विद्यार्थ्यांसह पालकांनी व्यक्त केलेली नाराजी**

**(१२) १२४७५ (०९-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या डिप्लोमा इन कॅम्प्युटर इंजिनिअरिंगच्या अंतीम वर्षाचा निकाल लागला यामध्ये शासकीय तंत्रनिकेतनाच्या एकूण ५२ विद्यार्थ्यांना तब्बल ४ विषयात कमी गुण मिळाले असल्याने उपरोक्त लागलेल्या निकालाच्या विषयी विद्यार्थ्यांसह पालकांकडून नाराजी व्यक्त होत असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना बोर्डाच्या पुनर्मुल्यांकनासाठी विद्यार्थी फक्त दोन विषयांचे अर्ज भरु शकतात त्यासाठी रु. ५२० शुल्क भरावे लागणे, मात्र चार विषयात कमी गुण मिळाल्याने या विद्यार्थ्यांनी काय करावे असा प्रश्न उपस्थित होत असून उपरोक्त नियम रद्द करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुर्नमुल्यांकनासाठी असलेल्या नियमावलीत बदल करण्यासाठी काही विद्यार्थी व पालकांकडून मागणी करण्यात आलेली आहे.

(३) विद्यार्थी व पालकांकडून आलेल्या निवेदनावर विचार करुन निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने दि.१०.५.२०१३ रोजी एका तज्ञ समितीची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत पुर्नमुल्यांकनामुळे येणारा कामाचा ताण, राज्यातील इतर विद्यापीठांकडे प्रचलित असलेल्या पुर्नगुणमुल्यांकनाच्या कामात शिक्षकवर्ग गुंतल्याने शैक्षणिक कामकाजावर होणारा परिणाम अशा सर्व बाबी विस्तृतपणे चर्चा झाल्यानंतर समितीने सदर बैठकी प्रस्तुत परिस्थितीत नियमावलीत कोणताही बदल करु नये असा निर्णय घेतलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जि.बुलढाणा येथील अतिवृष्टीने खचलेल्या विहिरींसाठी नुकसान भरपाईचा लाभ मिळण्यापासून शेतकरी वंचित राहिल्याबाबत**

**(१३) १२४७७ (०८-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जि.बुलढाणा येथील अतिवृष्टीने खचलेल्या विहिरींसाठी नुकसान भरपाईचा लाभ

मिळण्यापासून जिल्ह्यातील ८६९ शेतकरी वंचित राहिले आहेत, प्रशासकीय समन्वयाअभावी शासन निर्णयानुसार मुदत संपल्याने जिल्ह्यातील विहीर पडक्या अवस्थेतच असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पडक्या विहिरींच्या कामांसाठी नव्याने मुदतवाढ देऊन खरीप हंगामाच्या पिकासाठी विहिरींचा लाभ देता येईल यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यात सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे ७६४ व बुजल्यामुळे १०५ अशा एकूण ८६९ विहिरी बाधित झाल्या आहेत. महात्मा गांधी नरेगाअंतर्गत खचलेल्या व बुजलेल्या विहीरींच्या दुरुस्तीची कामे दिनांक २३ मे, २०१४ अन्वये घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या.
(२) शासन परिपत्रक दिनांक ५ जानेवारी, २०१५ नुसार सदर कामस दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती तालुक्यात नांदगाव पेठ येथे एम.आय.डी.सी. उभारण्याबाबत

**(१४) १२५२९ (१०-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती तालुक्यात २० वर्षापूर्वी (१९९४-९५) नांदगाव पेठ येथे एम.आय.डी.सी. उभारण्यासंदर्भात १२ गावांची जमीनी अधिग्रहीत करण्यात आली, परंतु या जमिनीचा मोबदला अद्यापही मिळाला नसल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने संपादित केलेल्या जमिनीपैकी २८६ हेक्टर जमीन २००४ मध्ये देण्यात आली असून या हस्तांतरीत जमिनाचाही मोबदला अद्याप शेतक-यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला बाजारभावानुसार देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१), (२) व (३) अतिरिक्त अमरावती (नांदगांव पेठ) औद्योगिक क्षेत्रासाठी एकूण २६९२.५६ हे.आर एवढे खाजगी क्षेत्र महामंडळाने सन १९९७ साल महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमातील तरतुदीनुसार संपादित केलेले आहे. भूसंपदान अधिकारी, अमरावती यांनी जमिन मोबदल्यापोटी संबंधित भूधारकांना रु.१४,६२,७१,५८१/- इतक्या रक्कमेचे वाटप करुन जमिनीचा ताबा महामंडळाकडे सुपुर्द केलेला आहे. तथापि, सदर जमिनीचा मोबदला मान्य नसल्याने ९४४ भूधारकांनी दिवाणी न्यायलय, वरिष्ठ स्तर, अमरावती येथे वाढीव मोबदल्यापोटी दावे दाखल केले आहेत. त्यापैकी ३५५ खातेदाराची प्रकरणे लोकन्यायालयामार्फत आपसी समझोत्यानुसार रु.२,२५,००/- प्रती हेक्टर दर देऊन निकाली काढलेली आहेत. तसेच न्यायालयाने गुणवत्तेनुसार ३९१ प्रकरणे निकाल काढली असून, संबंधित खातेदारांना मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत १९५ प्रकरणे दिवाणी न्यायालय, अमरावती येथे न्यायाप्रविष्ठ आहेत.

उपविभागीय अधिकारी, अमरावती याच्याकडे भूसंपदान अधिनियम २८ (अ) खाली प्राप्त झालेल्या २५१ खातेदारांनरा भूसंपादन अधिकारी यांनी मागणी केलयानुसार ७ कोटी ४७ लक्ष इतकी रक्क्म वाटपासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने वीजेवर मिळणारी २० टक्के सबसिडी बंद करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१५) १२५३० (०४-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने वीजेवर मिळणारी २० टक्के सबसिडी बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे आधीच दरवाढीचा फटका बसला असतांना शासनाच्या महानिर्मितीने वीज नियामक आयोगाकडे दरवाढी संदर्भात प्रस्ताव दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानिर्मितीची वीज अन्य सार्वजनिक व खासगी पुरवठादारांपेक्षा १ रु २५ पैसे प्रतियुनिट इतकी महाग आहे त्यामुळे ग्राहकांना दरवर्षी सुमारे ५ हजार कोटी रु. चा फटका बसत आहे त्यामुळे कायद्यातील तरतूदी नुसार महानिर्मितीच्या औष्णीक केंद्रातील महागडी वीज खरेदी बंद करावी अशी मागणी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने वीज नियामक आयोगाकडे दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संघटनेच्या या मागणीवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

ग्राहक संघटनेने मागणी केली आहे परंतु ग्राहकांवरील बोजाबद्दलचे विधान खरे नाही.
(३) भारप्रेषणाच्या नियमावलीनुसार उपलब्ध वीज पुरवठा व मागणी यांची सांगड घालतांना मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यास, तुलनेने महागडी वीज खरेदी बंद करणे अनिवार्य असते. म्हणजेच नियमानुसार महागड्या वीज खरेदी संदर्भात ग्राहकांच्या हिताची काळजी घेण्यात येते. सद्य:स्थितीत या नियमाचे काटेकोरपणे पालन होत असल्यामुळे, अशा परिस्थितीत उपलब्ध वीजपैकी महानिर्मिती कंपनीची वीज तुलनेने महाग असल्यास, महानिर्मिती कंपनीच्या सदर औष्णिक केंद्राना वीज पुरवठा कमी करण्याचे आदेश मिळतात व अशा वीजेचा कोणताही अतिरिक्त बोजा ग्राहकांवर पडत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील उद्योगांमध्ये रोजगार निर्मुलन करण्याबाबत

**(१६) १२५४३ (१४-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील उद्योगांमध्ये तब्बल १ हजार कोटी रुपयांची गुंतवणुक असताना रोजगार निर्मिती क्षमता केवळ ४ हजार असल्याचे दि.१२.१२.२०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुंतवणूकीनुसार उद्योगांमध्ये रोजगार निर्मुलन करण्याबाबत मापदंड निश्चित करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. अमरावती जिल्ह्यातील अतिरिक्त अमरावती (नांदगाव पेठ) औद्योगिक क्षेत्र तसेच सदर क्षेत्रातील टेक्सटाईल्स झोनमध्ये मिळून एकूण १३९३५.०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून त्यामधून एकूण ९००५ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये ज्या मोठ्या उद्योगांना भुखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे, त्यांचेकडून भूखंड विकासाबाबतची कार्यवाही सुरु असून अद्याप उत्पादनास सुरुवात झालेली नाही.
(२) गुंतवणूकीनुसार रोजगाराबाबत मापदंड निश्चित नाहीत. तथापि रोजगार निर्मिती करणे व त्या अनुषंगिक उद्योगात गुंतवणूक करणे या दोन्ही बाबी स्वतंत्र असून या दोन्हीपैकी एका घटकावर आधारित उद्योगांना ठराविक टप्पा गाठल्यानंतर विशाल प्रकल्प दर्जा देण्यात येतो.

राज्यात विविध भौगोलिक क्षेत्रांची वर्गवारी अ,ब,क,ड,ड+ अशी करुन यासाठी किमान ड+ या प्रवर्गासाठी रु. २५० कोटी गुंतवणूक अथवा ५०० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देणा-या उद्योगास विशाल प्रकल्पांचे फायदे देण्याचे शासनाने घोषित केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ येथील सिमेंट नाला बांधकामात शासनाच्या निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(१७) १२५४७ (०८-०३-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ येथील सिमेंट नाला खोलीकरण व बांधकाम सुरु असून जामठी नाल्याचे खोदकाम केल्यानंतर त्या नाल्यात पुन्हा माती भरण्याचे काम येथील कृषी विभागाने करुन शासनाच्या निधीचा अपहार केल्याचे दिनांक २६ जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.
तथापि, या संदर्भात वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी (महसुल) यांनी फेब्रुवारी, २०१५ मध्ये पाहणी केली असता, नाला सुस्थितीत असून नाल्यामध्ये पाणी असल्याचे व नाल्यात माती भरलेली नसल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रहाटगांव (जि. अमरावती) येथील मनपा शाळेची दूर्दशा झाल्याबाबत**

**(१८) १२५६५ (०७-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रहाटगांव (जि.अमरावती) येथील मनपा शाळेची दूर्दशा झाली असुनही संबंधित व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे हे पाहता शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) सदर शाळा सुस्थितीत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(१९) १२५९५ (०६-०४-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील खारपाणपट्टयाला वरदान ठरणा-या अनेक पाटबंधारे प्रकल्पाचे सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबीत असल्याने प्रकल्पांची कामे रखडलीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सुधारीत मान्यतेच्या प्रस्तावांना मंजूरीसाठी जबाबदार अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे,
(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रस्तावांची सुधारीत प्रशासकीय मान्यतेची स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) अकोला जिल्ह्यातील खारपाण पट्टयातील ११ प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांचे (घुगंशी बॅरेज, शहापूर बृ.लपायो व वाई (संग्राहक) लपायो) सुप्रमा प्रस्ताव शासन स्तरावर मान्यतेचे प्रक्रियेत व १ प्रकल्पाचे (काटेपुर्णा बॅरेज) सुप्रमा प्रस्ताव रा.तां.स.स नाशिककडे कार्यवाहीत आहेत. तथापि, सदर प्रकल्पांवर सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वितरीत निधीच्या मर्यादेमध्ये प्र.मा. किमतीपेक्षा वाढीव खर्चाला, सुप्रमा प्रस्तावाच्या किंमतीच्या अधीन राहुन खर्च करण्यास मान्यता दिली आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील १७९६ पाणी नमुन्यांपैकी**
**२९५ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याबाबत**

**(२०) १२५९७ (०६-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील १७९६ पाणी नमुन्यांपैकी २९५ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे जिल्हा आरोग्य विभागाने माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अशुध्द पाण्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे अशंतः खरे असून जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांचेकडून प्राप्त माहितीनुसार डिसेंबर २०१४ या कालावधीत खर्डी, खु. ता.माणगाव, जिल्हा-अलिबाग येथे दुषित पाण्यामुळे अतिसाराची लागण झाली होती.
(३) पाणी शुध्दीकरणाची जबाबदारीस्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. त्यामुळे जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, रायगड अलिबाग, यांचेमार्फत अणुजीव तपासणीअंती दुषित आढळुन आलेल्या पाणी नमुन्यासंबंधी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांना कळविणत येते. त्यानुसार संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत ग्रामपंचायतीना पाणी शुध्दीकरणाबाबत कळविण्यात येते.

---

**राज्यातील बीएमएस, एमबीए व डिप्लोमा/ डिग्री विद्यार्थ्यांना एस.टी. पास सवलतीबाबत**

**(२१) १२६०३ (०९-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बीएमएस, एमबीए व डिप्लोमा/ डिग्री विद्यार्थ्यांना एस.टी. पास सवलतीबाबत मुंबई इंटरप्रायजेस सामाजिक संस्था, दादरपाडा, उरण, जि.रायगड यांनी मा.शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या विद्यार्थ्यांना एस.टी. पास सवलत देण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरूड तालुक्यातील (जि.अमरावती) येथे थंडीच्या लाटेने पिकांचे मोठे नुकसान झाल्याबाबत**

**(२२) १२६०९ (१०-०१-२०१४). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरूड तालुक्यातील (जि.अमरावती) दि. १९ व ३० डिसेंबर २०१४ रोजी थंडीच्या लाटेने पिकांचे मोठे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दि. ३१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.कृषीमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१) अमरावती जिल्हयातील वरुड तालुक्यात दिनांक १९ व ३० डिसेंबर, २०१४ रोजी थंडीच्या लाटेने नुकसान झालेले नाही.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ता.किनवट जि.नांदेड येथे गावठी दारूच्या भट्टयांचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(२३) १२६१६ (०८-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.किनवट (जि.नांदेड) येथील खेडोपाड्यात गावठी दारूच्या भट्टयांचे प्रमाण वाढल्याचे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादन शुल्क कार्यालय, किनवट येथील अधिकारी व कर्मचारी याकडे जाणीपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४)

किनवट तालुक्यात, अवैधरित्या तयार होणाऱ्या गावठी दारु विक्रेत्यांवर वेळोवेळी राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाद्वारे नियमितपणे कारवाई केली जाते. सन २०१३ ते दिनांक १५.४.२०१५ या कालावधीत एकूण ३०६ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत नियमितपणे अवैध ठिकाणी धाडी टाकून गुन्हे नोंद करीत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत डीप सी.सी.टी, एम.एन.बी. व सी.एन.बी वन जमिनीतील काम करणाऱ्या मजुरांच्या मजूरीत वाढ करणेबाबत**

**(२४) १२६१९ (०८-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत डीप सी.सी.टी, एम.एन.बी. व सी.एन.बी वन जमिनीतील ०/१ ते /१० कि.मी. अंतरावर काम असताना मजुरांना शासन १६८ रुपये मजूरी देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मजूरी ही अत्यल्प असल्याने मजुरांना ती परवडत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने १६८ रुपयांऐवजी २०० रुपये मजूरी करणार आहे का व यासंदर्भात ६०% मशिनरी व ४०% मजुरी मिळणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,

(४) अद्यापपर्यंत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०१५) :** (१) व (२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ (४२ वा २००५) मधील कलम ६ नुसार प्रत्येक राज्यासाठी मजुरी दर निर्धारित केला जातो. त्यानुसार केंद्र शासन दरवर्षी प्रत्येक राज्यासाठी मजुरी दर निश्चित करते. सन २०१४-१५ करीता महात्मा गांधी नरेगाअंतर्गत मजुरी दर दिनांक १ एप्रिल, २०१४ पासून रु. १६८/- इतका निधारित करण्यात आला होता.

(३) केंद्र शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१५ च्या अधिसुचनेनुसार राज्यासाठी दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून रु. १८१/- इतका मजुरी दर निश्चित केला आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १० एप्रिल, २०१५ अन्वये मजुरी दरपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) मधील अनुसूची २ मधील कलम १९ मध्ये मजुरी साहित्याचे ६०:४० प्रमाणाबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत कार्यान्वयीन यंत्रणा असल्यास मजुरी साहित्याचे ६०:४० प्रमाण ग्रामपंचायत स्तरावर व इतर यंत्रणा कार्यान्वयीन यंत्रणा असल्यास मजुरी साहित्याचे ६०:४० प्रमाण जिल्हा स्तरावर ठेवणे बंधनकारक आहे व यामध्ये राज्य शासनास कोणताही बदल करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हा व परिसरामध्ये विविध प्रकारचे सुमारे १५ चो-यांच्या गुन्हयांचे प्रयत्न झाल्याबाबत**

**(२५) १२७०२ (०७-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा व परिसरामध्ये दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३० जानेवारी, २०१५ पर्यंत

विविध प्रकारचे सुमारे १५ चो-यांच्या गुन्हयांचे प्रयत्न झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चोरट्यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे काय, तसेच चो-यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) होय.

वाशिम जिल्हा व परिसरामध्ये दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३० जानेवारी, २०१५ या कालावधीत चोरी या सदराखाली एकूण ४५ गुन्हे दाखल झाले असून सदर गुन्ह्यांमध्ये रु. १२,५१,०४३/- ची मालमत्ता चोरीस गेली आहे.
(२) एकूण ४५ गुन्ह्यांपैकी ८ गुन्हे उघडकीस आले असून एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या मालापैकी रु. १,६२,४९६/- ची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

चोरीच्या गुन्ह्यांना आळा बसण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत परिसरामध्ये सशस्त्र मोटार सायकल पेट्रोलिंग लावण्यात आली आहे. राज्य महामार्ग २०७ वर दरोडा प्रतिबंधक सशस्त्र पेट्रोलिंग लावण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातील ३ उपविभागीय स्तरांवर दररोज पेट्रोलिंग लावण्यात आली आहे. पोलीस स्टेशन वाशिम शहर, रिसोड, मंगळुरपीर येथे बीट मार्शल सुरु करण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमधून पोलीस स्टेशन परिसरात दररोज रात्रीची गस्त लावण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यात अचानकपणे वेगवेगळ्या ठिकाणी नाकाबंदी करुन वाहन तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंगराळ, सावरगांव (ता.मानोरा, वाशिम) येथील रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेला रस्ता अद्यापपर्यंतही तयार करण्यात आला नसल्याबाबत**

**(२६) १२७०९ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगराळ, सावरगांव, ता.मानोरा, वाशिम येथील सन २००४ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेला रस्ता अद्यापपर्यंतही तयार करण्यात आला नसल्याची बाब उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्ता अद्यापही पूर्ण न होण्याची कारणे काय,
(३) असल्यास, तातडीने हा रस्ता पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :** (१) होय.

(२) डोंगराळ सावरगांव येथील रोहयो अंतर्गत मंजुर झालेल्या रस्त्यंची एकुण लांबी ४.५० कि.मी.पैकी सुरुवातीची रस्ता लांबी १.५० कि.मी.चे काम हे पूर्ण झालेले आहे. उर्वरीत ३.०० कि.मी. चा रस्ता वन जमीनीच्या मान्यतेअभावी काम पूर्ण होऊ शकले नाही.

(३) सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यास्तव वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत ह्या रस्त्याच्या वन जमिनीचा वळतीकरणाचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, बांधकामविभाग जि.प.वाशिम यांचे ऑनलाईन प्रस्ताव क्र.एफ.पी./एम.एच./रस्ता/१२१५८ दि.२९/०४/२०१५ अन्वये प्रघान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचे कडे मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे. प्रस्तावास मान्यता प्राप्त होताच रस्त्याचे काम पूर्णकरण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यामध्ये कृषी विभागांतर्गत विविध प्रकारच्या योजनेबाबत**

**(२७) १२७२१ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये कृषी विभागांतर्गत विविध प्रकारच्या योजना गतिमान पाणलोट, विहिर सिंचन, वीडीपीपी, आयडब्लु, एम.पी.डी.सी.सिमेंट तलावबांध, रोपवाटीका इत्यादी ज्या राबविल्या गेल्या आहेत त्यांची वर्ष २०१३-१४, २०१४-१५ मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता झाली असल्याची बाब जिल्हा नियोजन सदस्यांनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ मधील सभेमध्ये मांडली असून त्या बाबींची चौकशीची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषींविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) अद्याप चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील निम्न वर्धा, आजनसरा, लालनाला आदी सिंचन प्रकल्पाद्वारे शेतक-यांना प्रत्यक्ष सिंचनाच्या लाभ मिळण्याबाबत**

**(२८) १२७४३ (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील निम्न वर्धा, आजनसरा, लाल नाला आदी सिंचन प्रकल्पाद्वारे शेतक-यांना प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळावा यासाठी सलगरितीने पाणी पोहचविण्यासाठी पाटच-यांच्या कामांना प्राधान्य देण्यासोबतच अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करा अशी सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ दरम्यान झालेल्या वर्धा जिल्हा विकास काम आढावा बैठकीत दिल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेच्या अनुषंगाने शासन / प्रशासनामार्फत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०७-२०१५) :** (१) होय.

(२) निम्न वर्धा प्रकल्प : निम्न वर्धा प्रकल्पावर जून, २०१४ अखेर निर्मित सिंचन क्षमता १७७६४ हे. असून सदर क्षेत्रावरील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने भू-विकास भाग १ कामाचे नियोजन करुन तातडीने कामे हाती घेण्यात आली आहेत.

सन २०१५-१६ मध्ये १०,००० हेक्टर क्षेत्रावर लाभक्षेत्र विकासाची कामे करण्याचे प्रस्तावित आहे. त्यादृष्टीने वितरण व्यवस्थाचा प्राथम्यक्रम निश्चित करुन निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.

आजनसरा प्रकल्प : सदर प्रकल्पाकरीता लागणारी वनजमिन व भूसंपादान कमीत कमी ठेवून प्रकल्प व्याप्तीत बदल करुन प्रकल्पांचा नव्याने जलशास्त्रीय अभ्यास करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.

लाल नाला प्रकल्प लाल नाला प्रकल्पाच्या धरणाचे काम व मुख्य कालव्यातील ७ कि.मी. पर्यंतच्या मुख्य कालवा व वितरण प्रणालीची वर्धा जिल्ह्यातील कामे अंतिम टप्प्यात आहेत. त्यातील ४५ हेक्टर्स वरील भूविकास भाग १ ची कामे प्रगतीपथावर आहेत. कालव्याची व वितरणप्रणालीची चंद्रपूर जिल्ह्यातील कामे प्रगतीपथावर आहेत.

या प्रकल्पाची एकूण ७२९० हेक्टर पैकी ३९०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली असून सन २००७-०८ पासून सिंचन सुरु आहे.

(३) होय.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यातील शेतक-यांना शासनामार्फत**
**पीक विमा योजनेची रक्कम मिळाली नसल्याबाबत**

**(२९) १२७५२ (०४-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे वर्धा जिल्ह्यातील शेतक-यांच्या अनेक जमीन खरडून गेल्या त्याबदल्यात अद्यापही शेतक-यांना शासनामार्फत पीक विमा योजनेची रक्कम मिळाली नसल्याचे, जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने शेतक-यांना पीक विमा योजनेची रक्कम मिळवून देण्याबाबत शासन /प्रशासनामार्फत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१) पीक विमा योजनेतंर्गत पीकांच्या नुकसानी बाबत भरपाई देण्याची तरतूद आहे.

(२) व (३) पीक विमा योजनेमध्ये अतिवृष्टीचा समावेश होत नसल्याने, खरडून गेलेल्या जमिनीचा पीक विमा देण्यात आलेला नाही.

सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतजमिनीच्या नुकसानीबाबत बाधितांना मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनामार्फत राबविल्या जाणा-या ब्लड ऑन कॉल या**
**योजनेला खेड्यापाड्यात प्रतिसाद मिळत नसल्याबाबत**

**(३०) १२७७० (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत राबविल्या जाणा-या ब्लड ऑन कॉल या योजनेला खेड्यापाड्यात प्रतिसाद मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ ग्रामीण जनतेला करण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात रक्तपेढी उभारण्याबाबत राज्य शासनाने या योजनेत फेरफार करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फेरफारबाबत शासनामार्फत कोणती ठोस कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, सदरहू कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात आली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

ब्लड ऑन कॉल या योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालयाच्या ४० कि.मी. परिसरातील किंवा १ तासाच्या अंतरावरील शासकीय व खाजगी रुग्णालयांना रक्तपुरवठा करण्यात येतो. या योजनेंतर्गत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये एकूण ८९५ रक्त पिशव्यांची मागणी नोंद झाली होती व ८५० रक्तपिशव्या वितरीत करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ग्रामीण भागातील शासकीय व खाजगी रुग्णालयांचा देखील समावेश आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विमुक्त भटक्या जातींना अनुसूचित जाती-जमातीच्या सवलती मिळण्याबाबत**

**(३१) १२७७३ (१०-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सायमन अयंगर आयोग, काका कालेरकर आयोग, डी.एन.मेहरा आयोग यासह अन्य आयोगाकडे विमुक्त भटक्या जातींना अनुसूचित जाती-जमातीच्या सवलती मिळाव्यात अशी शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारशीच्या अनुषंगाने अद्यापही विमुक्त भटक्या जातींना अनुसूचित जाती-जमातीच्या सवलती मिळत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) राज्यातील मूळ १४ विमुक्त जाती व मूळ २८ भटक्या जमाती यांचा समावेश अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमाती यामध्ये करावा किंवा कसे याकरिता अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी या विभागाच्या दि.२३/०८/२००४ च्या शासन निर्णयान्वये न्या.अशोक अग्रवाल अभ्यास समिती (आयोग) गठीत करण्यात आली होती. आयोगाची मुदत दि.३१/८/२०१२ रोजी संपुष्टात आल्यानंतर या आयोगास मुदतवाढ नाकारण्यात आली आहे. सदर आयोगाने अद्यापर्यंत केलेले सर्व कामकाज व दस्ताऐवज शासनाने ताब्यात घेतले असून या आयोगावर नवीन अध्यक्षांची नियुक्ती करण्याची कार्यवाही चालू आहे. आयोगाचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर यथोचित निर्णय घेण्यात येईल.

---

## वर्धा जिल्हयातील कांढली-सिंदी (रेल्वे) रस्त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे झालेली दुरवस्था

**(३२) १२७८० (१०-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील कांढली-सिंदी (रेल्वे) येथील रस्त्यांची अवस्था सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे दयनीय झाली असून तेथे अपघाताचे वाढते प्रमाण तसेच रस्त्याने वाहतुक करणे धोकादायक झाल्याने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तेथील स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१५) :** (१) व (२) प्रश्नांकित रस्त्याची एकूण लांबी १६.०० कि.मी. असून त्यातील रस्त्याचा काही भाग दबलेला असल्याचे आढळून आले होते.

सदर लांबीपैकी ८.०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे नाबार्ड व पुरहानी २०१४-१५ अंतर्गत रुंदीकरण व डांबरीकरण करण्यात आले आहे.

उर्वरित ८ कि.मी. रस्त्याच्या लांबीतील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला, अकोट तालुक्यांतील दोनशे विटभट्टी मालकांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(३३) १२७८७ (०४-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, अकोट तालुक्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावल्याने विट भट्टी मालकांचे जिल्हयात प्रचंड नुकसान झाले प्रत्येक विट भट्टी मालकांचे आर्थिक नुकसान दहा लाख रुपये दरम्यान झाल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी व महसूल विभाग ला दिलेल्या दिनांक ५ जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान निवेदनात म्हटले आहे, तथापी जिल्हयातील दोनशे विट भट्टीमालकांचे कोट्यवधीचे आर्थिक नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय,

(३) चौकशीअंती विट भट्टी मालकाचे कोट्यवधीचे नुकसान झाल्याने आर्थिक संकटात सापडणा-या विट भट्टी मालकांना आर्थिक नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१५) :** (१) होय.
(२), (३) व (४) नैसर्गिक आपत्ती अंतर्गत SDRF च्या निकषानुसार वीटभटटयांचे नुकसान झाल्यास त्या अंतर्गत आर्थिक मदत देय नाही.

---

**राज्यात रोजगार हमी योजनेच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ८ मधील अट शिथिल करण्याबाबत**

**(३४) १२८०४ (०८-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत दिनांक ८ जुलै, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ८ मधील अट शिथिल करण्याची मागणी मा.रोजगार हमी योजना मंत्री यांचे कडे परांडा वाशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०६-२०१५) :** (१) श्री.राहुल मोटे, विधानसभा सदस्य (परांडा-भूम-वाशी) यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये शासन निर्णय दिनांक ४ जुलै, २०१२ मधील मुद्दा क्र.८ मधील ५ अपुर्ण कामाबाबतची अट शिथिल करण्याबाबत शासनास विनंती केली आहे.
(२) यासंदर्भात शासन पत्र दिनांक १२ मार्च, २०१५ अन्वये सुधारित सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार एका ग्रामपंचायत क्षेत्रात एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता ५ पेक्षा जास्त कामे जरी अपुर्ण असली तरी सदर ग्रामपंचायत क्षेत्रात मजुरांच्या कामाची मागणी असल्यास त्या ठिकाणी प्राधान्याने मजुर प्रधान जलसंधारण व जलसंवर्धनाची कामे घेता येतात व अशा कामांना जिल्हाधिकारी यांची कार्योत्तर मंजुरी घेण्याची तरतुद आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गिरवली (ता.भूम,जि.उस्मानाबाद) येथे ३३ के.व्ही. चे सबस्टेशन उभारण्यास मान्यता न मिळाल्याबाबत**

**(३५) १२८०६ (०४-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गिरवली (ता.भूम,जि.उस्मानाबाद) येथे ३३ के.व्ही. चे सबस्टेशन उभारण्याची मागणी

एक वर्षापूर्वी करुनही त्यास अद्याप मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सर्वसाधरण कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर सबस्टेशन अभावी नागरिकांचे नुकसान होवू नये म्हणून सबस्टेशन तातडीने उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०७-२०१५) :** (१) होय.
(२) मौजे गिरवली (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे ३३ केव्ही उपकेंद्र उभारणीचा समावेश पायाभूत आखडा २ योजनेत केलेला नाही. त्यामुळे सदर उपकेंद्र दिनदयाळ योजनेत प्रस्तावित करण्यात येत आहे.
(३) सदर उपकेंद्र दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत नविन उपकेंद्र उभारणीचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिक्षण विभागाकडून सन २०१० मध्ये शिक्षक पदासाठी झालेल्या सीईटी परिक्षेत २१८१ विद्यार्थी पात्र असतानाही त्यांना अपात्र ठरविण्यात आल्याबाबत**

**(३६) १२८२४ (०९-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाकडून सन २०१० मध्ये शिक्षक पदासाठी झालेल्या सीईटी परिक्षेत २१८१ विद्यार्थी पात्र असतानाही शिक्षण विभागाच्या अधिका-यांच्या चुकीमुळे त्यांना अपात्र ठरविण्यात येऊन त्या जागांवर शिक्षण विभागाने दुस-या शिक्षकांची नियुक्ती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरण शिक्षकांनी न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने शिक्षण विभागाच्या अधिका-यांच्या चुकीमुळे ज्या पात्र उमेदवारांना अपात्र ठरविण्यात आले त्यांना सेवेत सामावून घ्यावे असा निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निकालाच्या अनुषंगाने शासनाने उपरोक्त अपात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना सेवेत समावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, अद्यापपर्यंत किती विद्यार्थ्यांना सेवेत रुजू करुन घेतले वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्नपत्रिकेतील त्रुटींमुळे मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुनर्पडताळणी करण्यात आली आहे. त्यापैकी ३०४१ पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून उर्वरित उमेदवारांना रिक्त जागांनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात “आम आदमी विमा” योजना सुरु करण्यात आल्याबाबत**

**(३७) १२८३२ (१०-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात “आम आदमी विमा” योजना दिनांक २७ ऑक्टोबर, २००७ सालापासून सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत नैसर्गिक मृत्यू झाल्यास, अपघाती मृत्यू झाल्यास, अपंगत्व आल्यास मदत तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेकांना अद्यापही यापैकी कोणतीही मदत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०६-२०१५) :** (१) आम आदमी विमा योजना राज्यात शासन निर्णय दि.१६ ऑक्टोबर, २००७ नुसार सुरु करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात सन २०१४-१५ अखेर पर्यंत १४१२ विमा दावे प्राप्त झाले होते. भारतीय आयुर्विमा महामंडळाने यापैकी ५१३ विमा दाव्यांची रु.१,७४,१५,०००/- इतकी रक्कम अदा केली आहे. ४२३ विमा दावे महामंडळाने नामंजूर केले आहेत व ४७६ विमा दावे महामंडळाकडे प्रलंबित आहेत. त्याप्रमाणे २०१४-१५ अखेरपर्यंत शिष्यवृत्तीसाठी ६५,३८४ अर्ज प्राप्त झाले होते. महामंडळाने त्यापैकी २३,८०५ विद्यार्थ्यांची रु.१,४२,८३,०००/- इतक्या रक्कमेची शिष्यवृत्ती अदा केली आहे.

(४) व (५) भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे प्रलंबित विमा दावे व शिष्यवृत्तीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील योजनांच्या लाभार्थ्यांची चौकशी थांबविल्याबाबत**

**(३८) १२८७९ (०९-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना लाभार्थ्यांची चौकशी थांबवावी, सर्व पेन्शन योजना तीन हजार प्रति महिना करावी, अपंग व्यक्ती प्रमाणपत्र देण्याची गडहिंग्लज येथील उपजिला रूग्णालयात व्यवस्था व्हावी, रेणुका जाधव या महिलेल्या पेन्शनची चौकशी थांबवावी, आदी मागण्यासंदर्भात श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली आजरा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) विधवा, परित्यक्ता, निराधार महिला, अपंग व वृध्दांचा प्रचंड मोर्चा नुकताच माहे जानेवारी, २०१५ मध्ये बाजार मैदान येथून आजरा

तहसली कार्यालयासमोर काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यासंदर्भात शासनाने चौकशी करून शासन स्तरावर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्रमिक मुक्ती दल अपंग पुनर्वसन समिती यांनी दि.१६/०१/२०१५ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

(१) शासन निर्णय दि.२६/१०/२०१० मध्ये सदर योजनांमध्ये लाभा घेणाऱ्या लाभार्थ्यांची पात्रता तपासणी वर्षातून एकदा करण्यात यावी, असे निर्देश आहेत. या तरतूदीनुसार पात्रता तपासणी हाती घेण्यात आली आहे.

(२) लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(३) अपंग व्यक्तिंनी चालविलेल्या बचत गटांची राष्ट्रीयकृत बँकेत खाती काढून घेण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा यांनी दि.२७/०१/२०१५ नुसार बँकांना कळविले आहे.

(४) अपंग प्रमाणपत्र जिल्हा रुग्णालयामार्फत देण्यात येतात. कोल्हापूर येथील जिल्हा रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारित येते व त्यांचेमार्फत दर बुधवारी सकाळी ९.०० ते १.०० या वेळेत प्रमाणपत्रे दिली जातात.

सदर निवेदनात रेणूका जाधव नावाच्या महिलेची चौकशी थांबविणेबाबत कोणतीही मागणी नव्हती. अपात्र लाभार्थी शोध मोहिमेत श्रीमती.रेणूका जाधव या नावाच्या कोणत्याही महिलेची चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक सेविका व अंगणवाडी कर्मचारी, महासंघ, कोल्हापूर येथील अंगणवाडी महिलांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत**

**(३९) १२८८४ (०८-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पूर्व प्राथमिक सेविका व अंगणवाडी कर्मचारी, महासंघ, कोल्हापूर येथील अंगणवाडी महिलांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०७-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सदर निवेदनातील मागण्यांबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे कार्यवाहीसाठी कळविण्यात आले असून आवश्यक तेथे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

---

**नाशिक जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळांचे नियमबाह्य पध्दतीने अनुदान मंजूर करण्यात आल्याबाबत**

**(४०) १२८८६ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळांचे मुल्य निर्धारण करताना मागील वर्षातील मूल्यनिर्धारणात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करुन न घेताच मनमानी पध्दतीने अनुदान मंजूर करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारे नियमबाह्य पध्दतीने अनुदान मंजूर करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणा-या संबंधित प्रादेशिक उपायुक्त व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१५) :**(१) नाही.

नाशिक जिल्ह्यात २८ मान्यता प्राप्त विजाभज अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून सदर आश्रमशाळांच्या मागील पाच वर्षातील त्रुटी विचारात घेऊन मूल्यनिर्धारण केले आहे. २८ पैकी २६ आश्रमशाळांना मूल्यनिर्धारण केल्यानंतर संचालनालयाकडून तदर्थ अनुदान देण्यात आले आहे. त्यापैकी उर्वरित २ आश्रमशाळांना अंतर्गत वादामुळे तदर्थ अनुदान देण्यात आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) तारळ व वडापाल्ये खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबत**

**(४१) १२८९३ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तारळ व वडापाल्ये खारभूमी योजनेला सीआरझेड मधून सूट मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०२-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) तालुका राजापूर येथील तारळ व वाडापाल्ये या खारभूमी योजनांना सीआरझेड अधिसुचना १९९१ मधून सुट मिळणेबाबतचा प्रस्ताव खारभुमी विकास मंडळ, ठाणे यांचेकडून प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण अर्थात एम.सी.झेड एम.ए. च्या दिनांक २४ व २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी संपन्न झालेल्या ९४ व्या बैठकीमध्ये चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. सीआरझेड अधिसूचना २०११ नुसार उपरोक्त नमुद नवीन खारभूमी योजनांसाठी जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणे आवश्यक आहे असा निर्णय सदर बैठकीमध्ये घेण्यांत आला. सदर निर्णयानुसार जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणेबाबत अधीक्षक अभियंता, खारभूमी विकास मंडळ, ठाणे यांना कळविण्यात आले आहे. सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

**हातकंणगले तालुक्यातील (जि.कोल्हापूर) नदी काठची जमिन वेगाने क्षारपड होत असल्याबाबत**

**(४२) १२८९८ (०७-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकंणगले तालुक्यातील (जि.कोल्हापूर) नदी काठची जमिन पाण्याच्या अतिवापरामुळे वेगाने क्षारपड होत असून जमिन नापिक होण्याचा धोका असल्याचे कृषि विभागाने गतवर्षी केलेल्या माती परिक्षणातून नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्याची फलःनिष्पत्ती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) या संदर्भात वारणा व पंचगंगा नदी काठच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये ठिबक सिंचनांचा कार्यक्षम वापर करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले असून तालुक्यातील एकूण बागायत क्षेत्राच्या जवळपास १५ टक्के क्षेत्रावर ठिंबक सिंचन संच बसविणेत आलेले आहेत. उस विकास योजनेतून हिरवळीचे खत व जिप्सम पुरवठा करण्यात आला आहे. सदर योजनेंचा लाभ घेतल्यामुळे वेगाने होणा-या क्षारपड जमिनीमध्ये सुधारणा होत आहे भविष्यात नापीक/क्षारपड जमिन होवू नये यासाठी उघड्यावरील चर खोदाई करणे सच्छीद्र पाईप प्रणालीचा वापर करणे, ठिबंक सिचनांचा वापर करणे व जिप्सम व हिरवळीच्या खतांचा वापर करणेबाबत या गावांमध्ये कृषि विभागामार्फत प्रचार व प्रसार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार (अपंग) योजना आणि श्रावणबाळ योजनेतील अपात्र लाभार्थ्यांची शोध मोहिम राबविल्याबाबत**

**(४३) १२९०६ (१०-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार (अपंग) योजना आणि श्रावणबाळ योजनेतील अपात्र लाभार्थीची शोध मोहिम राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शोध मोहिमेत ज्यांच्याकडून प्रस्तावांची छाननी झाली, त्यांच्याकडूनच प्रस्ताव अपात्र ठरविले जात असल्याने अनेक पात्र लाभार्थींना याचा लाभ मिळत नसल्याने त्यांना आर्थिक गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची निपक्षपाती चौकशी होण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक २६/१०/२०१० मधील निर्देषानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील सदर लाभार्थ्यांची वार्षिक पात्रता तपासणी सुरु करण्यात आली आहे. या तपासणीत मयत, स्थलांतरीत निकषापेक्षा कमी/जास्त वय असणे, स्वत: नोकरी/व्यवसाय करीत असो, कमावती मुले असणे इ. कारणांमुळे अपात्र असल्याचे आढळून आलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्यात आले आहे. मात्र पात्र असल्याचे आढळून आलेल्या लाभार्थ्यांना अनुदान देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतीय नर्सिंग कौन्सिल आणि महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या मानकाप्रमाणे बीएससी कॉलेजमध्ये शैक्षणिक व शिक्षकेतर पदांचा भरणा न केल्याबाबत**

**(४४) १२९३० (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय नर्सिंग कौन्सिल आणि महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाच्या मानकाप्रमाणे बीएससी कॉलेजमध्ये शैक्षणिक व शिक्षकेतर पदांचा भरणा गेल्या आठ वर्षापासून करण्यात आलेला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीएनएमचा दर्जा वाढूवन मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर येथे सुरु करण्यात

आलेल्या बीएससी नर्सिंग कॉलेज चालविण्यासाठी शासनाने स्वतंत्र आर्थिक निधीची तरतूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब क्र. (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) बाबत नमूद करण्यात येते की, विषयांकीत परिचर्या महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी भारतीय परिचर्या परीषदेच्या मानकानुसार प्रार्चाय, उपप्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि अधिव्याख्याता या संवर्गातील पदे भरण्यास व त्या पदाकरीता लागणा-या वेतन व भत्त्यापोटीची तरतूद चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

सदर पदे नव्याने निर्माण केलेली असल्यामुळे या पदाच्या सरळ सेवा/पदोन्नती कोटयातील पात्र उमेदवार सद्य:स्थितीत तातडीने उपलब्ध होण्याची शक्यता नसल्यामुळे सदर पदे लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रातून वगळून त्या पदावर सद्य:स्थितीत जे जेष्ठतम पाठयनिर्देशक शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत अशा पाठयनिर्देशकांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सरकारी योजनेतून एचआयव्ही बाधित रुग्णांचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याबाबत

**(४५) १२९४९ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एचआयव्ही बाधिक रुग्णांना संजय गांधी योजना, बाल संगोपन योजना, श्रावण बाळ योजना, पोषक आहार योजना, अत्योदय योजना आदिंच्या माध्यमातून सरकारी मदत म्हणून दरमहा ४०० ते ६०० रु. मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मदत मिळण्यास पात्र असलेल्या उमेदवारास एचआयव्ही बाधित असण्याबरोबर इतर ब-याच अटिंची पुर्तता करावी लागते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब क्र.१ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच चौकशीच्या अनुषंगाने एचआयव्ही बाधित रुग्णांचे प्रलंबित प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

एचआयव्ही बाधित रुग्णांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत प्रतिलाभार्थी प्रतिमाह रु. ६००/- तर एचआयव्ही बाधित पालकांच्या बालकांना बाल संगोपन योजनेअंतर्गत

प्रतिलाभार्थी प्रतिमाह रु.४२५/- एवढे अनुदान दिले जाते. मात्र शालेय पोषण आहार योजना व अंत्योद्य अन्न योजना या एचआयव्ही बाधित रुग्णांशी संबधित नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

एचआयव्ही बाधित रुग्णांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गतचा लाभ घेण्याकरिता जिल्हा शल्यचिकीत्सक/शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक यांच्या दाखल्याची आवश्यकता असते त्याचप्रमाणे वय, उत्पन्नाचा दाखला, दारिद्रय रेषेखाली असल्याचा पुरावा, रहिवाशी दाखला इत्यादीबाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे असते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अपात्र उमेदवारांना पदावर नसतानाही वरच्या पदाची वेतनश्रेणी लागू करण्यात आल्याबाबत

**(४६) १२९५० (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या वीजनिर्मिती कंपनीने २००६ च्या दरम्यान कार्यकारी अभियंता पदाच्या भरती प्रक्रियेत तर अपात्र उमेदवारांना पदावर नसतानाही वरच्या पदाची वेतनश्रेणी लागू करण्यात आल्याची धक्कादायक बाब माहे डिसेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या मानव संसाधन विभागाने कोणतीही सक्षम निवड समिती गठीत न करताच उमेदवारांची नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्रं.१ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदी व खो-यामध्ये उपलब्ध असलेले पाणी कुठेही अडविले गेले नसल्याबाबत

**(४७) १२९५३ (०८-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदी व खो-यामध्ये उपलब्ध असलेले पाणी कुठेही अडविले गेले नसल्यामुळे वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कयाधू नदीच्या खो-यामध्ये सध्या एकूण किती पाणी उपलब्ध आहे,

(३) असल्यास, सदर उपलब्ध पाण्याचा वापर करण्याकरिता शासनाकडून कोणत्या व्यवहार्य सिंचन योजना प्रस्तावीत केल्या गेल्या आहेत,
(४) असल्यास, सदर प्रस्तावीत सिंचन विहीत कालावधीत पूर्ण करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे वा येईल ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कयाधू नदीवरील सापळी धरणाचे नियोजित काम प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे अद्‌याप चालू झाले नसल्याने नियोजित पाणीसाठा होऊ शकला नाही.
(२) कयाधू नदीच्या उपखोऱ्यात सापळी धरणाचे खरिप बचतीतून हिंगोली जिल्हयातील सापळी धरणाचे पाणलोट क्षेत्रात १०८.८३ द.ल.घ.मी. पाणी वापराच्या नवीन योजना हाती घेण्यास मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांनी मंजुरी दिलेली आहे.
(३) उपलब्ध पाण्याचा वापर करण्यासाठी १५ ल.पा. योजना प्रस्तावित केल्या आहेत. या १५ ल.पा.योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र करण्यात आले असून त्यापैकी ५ योजनांना प्र.मा.प्राप्त झाली आहे. तसेच कयाधू नदीवर हिंगोली जिल्हयात ५ को.प. बंधाऱ्यांची श्रृंखला प्रस्तावित आहे.
(४) उपरोक्त १५ ल.पा. योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले असून, या पैकी ५४ योजनांना प्र.मा.प्राप्त झाली असून त्यांची निविदा झाली आहे. यापैकी नवलगव्हाण सा.त.या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. कयाधू नदीवर सद्‌य:स्थितीत प्रस्तावित ५ को.प. बंधाऱ्यांना पाणी उपलब्धता प्राप्त करणेसाठीची कार्यवाही चालू आहे.

---

## हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदन रस्त्यांच्या कामांना मंजूरी बाबत

**(४८) १२९५५ (०८-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदन रस्त्यांच्या कामांना मंजूरी नसल्यामुळे कामे बंद असून मजुरांना कामे मिळत नसल्यामुळे मजुरांचे मोठ्या प्रमाणांवर स्थलांतर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील पांदन रस्त्यांची कामे मंजुर न होण्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत पांदन रस्त्यांची कामे सुरु करुन मजुरांचे स्थालंतर थांबविण्यासाठी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयात पंचायत समिती हिंगोली, औंढा ना.कळमनुरी, सेनगाव, बसमत येथे एकूण ३१७ पांदन रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच हिंगोली जिल्हयात

ग्रामपंचायत स्तरावर एकूण ३६३७ कामे शेल्फवर आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) हिंगोली जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर एकूण ३६३७ कामे शेल्फवर ठेवण्यात आलेली आहेत. त्यानुसार मजुरांमार्फत कामाची मागणी प्राप्त होताच उपलब्ध असलेल्या कामांपैकी संबंधीत मजूरांना काम उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**लोहारा (ता.जि. हिंगोली) येथील साठवण तलावाबाबत**

**(४९) १२९५८ (०८-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहरा (ता.जि.हिंगोली) येथील साठवण तलावाचे बुडीत क्षेत्रातील सर्व जमीनीचे भुसंपादन झाले नसतांनाही तलावाचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावाच्या बुडीत क्षेत्रातील सर्व जमीनीचे भुसंपादन अद्यापही न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) बुडीत क्षेत्रातील भुसंपादन न झालेल्या जमीनीचे भुसंपादन करुन सदर जमीनीचा मावेजा संबंधीत शेतक-यांना निश्‍चित किती कालावधीत देण्यात येईल ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) होय
(२) सदर पाझर तलावाच्या बुडीत क्षेत्रात अ) लोहरा ब) डिग्रसवाणी व क) येहळेगाव या तीन गावातील क्षेत्र येते.
मौजे लोहरा येथील जमिनीचे भुसंपादन झाले असून मावेजा वाटप केला आहे.
मौजे येहळेगाव व डिग्रसवाणी या गावातील जमिनीच्या मालकीबाबत वाद असल्याने तसेच ७/१२ वर निश्‍चित क्षेत्र दर्शवले नसल्याने संबंधित शेतकऱ्यांची संमतीपत्रे मिळविण्यास विलंब झाला आहे.
(३) सदर जमिनीच्या संयुक्त मोजणीचा प्रस्ताव सादर केला असून संयुक्त मोजणी झाल्यानंतर मावेजा वाटप करण्यात येईल.

---

**हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, सेनगांव व औंढा (ना.) तालुक्यातील शाळेतील मुलींना मोफत प्रवासासाठी एस.टी.बस अनेक गावापर्यंत पोहचत नसल्याबाबत**

**(५०) १२९६३ (०४-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, सेनगांव व औंढा (ना.) तालुक्यातील शाळेतील मुलींना मोफत प्रवासासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत सुरु करण्यात आलेल्या एस.टी.बस अनेक गावापर्यंत पोहचत नसल्यामुळे विद्यार्थीनीना त्रास होत असून शिक्षणावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस शाळेतील मुली प्रवास करीत असलेल्या मार्गावर न धावण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) हिंगोली, सेनगांव व औंढा (ना.) तालुक्यात शाळेतील मुली प्रवास करीत असलेल्या मार्गावर मानव विकास कार्यक्रमांतर्गत एस.टी.बसेस पुरेशा प्रमाणात धावण्याबाबत शासनाकडून उपाययोजना करण्यात येईल काय ?

**श्री. दिवाकर रावते (१४-७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली सेनगांव व औंढा तालुक्याच्या शाळेतील मुलींना वाहतूक सुविधा पुरविण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यासाठी ५ बसेसचा पुरवठा करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर बसेस मानव विकास समिती यांनी निर्देशित केलेल्या मार्गावर चालविल्या जातात.

मानव विकास योजनेअंतर्गत नियोजन विभागाच्या दिनांक ११.०७.२०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे हिंगोली, सेनगांव व औंढा नागनाथ या तालुक्यातील शालेय विद्यार्थीनींना बसेसची सेवा उपलबध करुन देण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.